# शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाने सोनसाखळी चोरट्यांना केले जेरबंद

दै. देशोन्नती दि. 07/06/2023

## २५ ग्रॅम सोने व दोन मोटारसायकल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ रेल्वे स्टेशन ते यशवंत महाविद्यालयाकडे जाणारे मार्गावर मॉर्निंग वॉक करणाऱ्या महिलेच्या गळयातील दिड तोळे सोन्याचे गंठन जबरीने हिसकावुन घेवुन २९ मे रोजी सकाळी पलायन करणाऱ्या व ४ जून रोजी सकाळी मगणपुरा मार्गावर महिलेचे गंठण चोरणाऱ्या चोरट्याना शिवाजीनगर ठाण्याच्या डीबी पथकाने गजाआड केले आहे.

२९ मे रोजी रेल्वे स्थानक ते यशवंत महाविद्यालय मार्गावर एका महिलेच्या गळयातील दिड तोळे सोन्याचे गंठण तसेच ४ जून रोजी सकाळी ६.३०वाजताचे दरम्यान मगनपुरा नविन मोंढा येथील सार्वजनीक मार्गावर मॉर्निंग वॉक करणारी महिला हिचे पाठीमागुन ३ इसम मोटारसायकलवर येवुन सदर महिल्याचे गळयातील दिड तोळयाचे शॉर्ट गंठण हिसकावुन नेल्याने या दोन्ही प्रकरणात शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सतत एका पाठोपाठ दोन घटना घडल्याने पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव यांनी शिवाजीनगर पोलिसांना यांना त्वरीत गुन्हे उघड करण्याचे आदेश दिले होते.त्यानुसार पोलीस निरीक्षक विलास गोबाडे यांनी ५ जून रोजी गुंन्हे शोध पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना नेमुन सकाळी ५ वाजेपासुन पोलीस स्टेशन हद्दीत परिसरात सापळा लावण्याचे आदेश दिल्याने आदेशाप्रमाणे सापळा लावुन सकाळी तिन संशयीत इसमाचे मोटार सायकलचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी वरील दोन्ही घटना केल्याचे कबुल केल्याने आरोपी ओंकार उर्फ विराट भुमक (२३) रा.पांगरी व अर्जुन मोरे(२३) रा.विष्णुनगर व विधीसंघर्षग्रस्त बालक याचे ताब्यातुन दोन्ही गुन्हयातील जबरीने चोरलेले सोन्याचे गंठन व एक शॉर्ट गंठन व तुटलेल्या गंठनाचा भाग असा एकुण १ लाख २५ हजार रुपये किमतीचा ऐवज व दोन मोटार सायकल जप्त केल्या.